दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३९ वा मंगळवार दि.१२ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# काँग्रेसच्या काळातच दलितांवर सर्वाधिक अत्याचार - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## संविधान बदलण्याचा भ्रम पसरविणाऱ्यांना शिक्षा देण्याचे आवाहन



लातूर/प्रतिनिधी: काँग्रेसच्या काळातच दलितांवर सर्वाधिक अत्याचार झाले.त्यावर उपाययोजना केल्या नाहीत.सत्ता असताना काँग्रेसने काय दिवे लावले ? असा सवाल करत राहुल गांधी यांना संविधानाची माहिती नाही.केवळ सत्ता मिळविण्यासाठी संविधान बदलाचा भ्रम या पक्षाने पसरवला.या माध्यमातून जनतेची फसवणूक करणाऱ्यांना शिक्षा द्या,असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ शहरातील शाहू चौक येथे आयोजित सभेत आठवले बोलत होते.या सभेस माजी खासदार अमर साबळे, डॉ.सुनिल गायकवाड,उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,माजी अध्यक्ष शैलेश लाहोटी,राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते ड.व्यंकट बेद्रे, प्रशांत पाटील,शिवसेनेचे ड. बळवंत जाधव,जितेंद्र बनसोडे,मोहसीन शेख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना रामदास आठवले म्हणाले की,काँग्रेसची राजवट भ्रष्टाचाराने बरबटलेली होती. त्याच काळात दलितांवरही अत्याचार घडत गेले.आता सत्ते बाहेर असताना काँग्रेस आरोप करत आहे.पण केंद्रात मोदींच्या नेतृत्वात राष्ट्रीय लोकशाही आघाडी व राज्यात महायुती सरकार आपल्या हितासाठी काम करत आहे. नरेंद्र मोदी हे क्टिव्ह पंतप्रधान आहेत.बौद्ध समाज आणि दलितांना न्याय देण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे.मागील ८ वर्षांपासून मी मंत्रिमंडळात आहे.मोदी यांनी संविधानाला नतमस्तक होत कारभार हाती घेतला.सर्वधर्म समभाव जोपासणारा भारत तयार करण्यासाठी ते काम करत आहेत.एक ओबीसी व्यक्ती तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान झाले असल्याचेही आठवले म्हणाले.

त्यांनी सांगितले की,भाजपाने लातूरमधून उच्चशिक्षित,डॉक्टर उमेदवार दिला आहे.जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी अर्चनाताई पाटील चाकूरकर सक्षम आहेत. गोरगरीब व बेरोजगारांच्या समस्या त्या सोडवतील.शहरातील पाणी व कचऱ्यासंदर्भात विधानसभेत आवाज उठवण्याचे काम त्यांच्याकडून केले जाईल,असेही आठवले म्हणाले.

बौद्ध धर्मात कमळाला अत्यंत महत्त्व आहे.हेच कमळ भाजपाचे निवडणूक चिन्ह आहे.त्यामुळे छत्रपती शिवराय.डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराजांना स्मरत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना निवडून आणा, असे आवाहनही आठवले यांनी केले.

माजी खासदार डॉ.सुनिल गायकवाड यांनी सांगितले की, काँग्रेस पक्ष जातीयवादी आहे. त्याच पक्षाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पराभूत करण्याचे पाप केले होते.त्यामुळे आपण काँग्रेसला मतदान न करता भाजपा उमेदवाराला विजयी करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

ड.बळवंत जाधव म्हणाले की,ही निवडणूक महायुती व महाविकास आघाडीची नाही तर महायुती विरुद्ध देशमुख अँड देशमुख कंपनीचा उमेदवार यांच्यात लढत होत आहे.
काँग्रेसने लोकसभेला दलिता ऐवजी लिंगायताला उमेदवारी दिली.या माध्यमातून स्वतःच्या हितासाठी लिंगायत समाजाचा गळा दाबण्याचे काम केले. काँग्रेसकडे दलित मताला किंमत नाही.ही मते विकत घेऊ असे त्यांना वाटते.आपल्या मताची विक्री करू नका,असे आवाहनही जाधव यांनी केले.

ड.व्यंकट बेंद्रे बेंद्रे यांनी काँग्रेस पक्ष लोकभावनेपासून दूर गेला असल्याचे सांगत नेतृत्वाचा अहंकारही वाढला असल्याचे म्हटले.देश अहंकाराने घडत नाही त्यासाठी दृष्टी असावी लागते. काँग्रेसचा अहंकार उतरवण्याची संधी आपल्याला चालून आली आहे.ही संधी दवडू नका,असेही ते म्हणाले.

महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की,आज सर्वत्र गाजत असलेली लाडकी बहिणी योजना ही अत्यंत कमी कालावधीत राबविण्यात आली.आजच पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित झाला असून त्यात लाडक्या बहिणीसाठी यापुढे २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे.या लाडक्या बहिणींमुळे महायुतीचा विजय होणार आहे. शहरातील ८६ हजार महिलांना योजनेचा लाभ मिळाला असून त्या महायुतीलाच मत देणार असल्याचे ताईंनी सांगितले. जिल्हा रुग्णालयाला जागा देण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस यांनी घेतला.त्यासाठी निधीही मंजूर केला.परंतु आपल्या आमदारांनी त्यासाठी पाठपुरावा केला नाही.हा निधी आजही पडून आहे.कामासाठी पाठपुरावा करणारा आमदार नसणे ही लातूरची शोकांतिका आहे. लोकप्रतिनिधीचे वर्तन पोषक नसते तेव्हा परिवर्तन करावे लागते,असेही ताई म्हणाल्या. आपणास राजा बनण्यासाठी मतदानाचा अधिकार दिला आहे, दलाल बनण्यासाठी नाही असे सांगून लातूरला दहशतमुक्त, भयमुक्त करण्यासाठी महायुतीला विजयी करा.तुमच्या सोबत राहणाऱ्याला विजयी करा,असे आवाहनही डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

देविदास काळे,जितेंद्र बनसोडे,प्रविण सुडे,संदेश सोनकांबळे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.ड.विजय अवचारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या सभेस चंद्रकांत बिराजदार, ड.दीपक मठपती,प्रविण सावंत,ड.दिग्विजय काथवटे, प्रमोद गुडे,गणेश गवारे,शिवसिंह शिसोदिया,विवेक बाजपाई,मंगेश बिराजदार,अनिल गायकवाड, महेश कौळखेरे यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**पहिला वार माझ्यावर होईल – डॉ.अर्चनाताई पाटील**

या सभेत बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की,मी तुमच्यातलीच आहे.उदगीर हे माझे माहेर आहे. एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात माझा जन्म झाला. सरकारी महाविद्यालयात मी शिक्षण घेतले.अनेक अडचणींचा सामना केला.इतरांच्याही अडचणी पाहत मोठी झाले.या अडचणी सोडवण्याची संधी मला हवी आहे.तुमच्यावर कुठलीही अडचण आली तर मी तुमच्यासोबत नाही तर तुमच्या पुढे असेन.तुमच्यावर आघात झाला तर तो वार मी झेलेन. लोकशाहीचा प्रतिनिधी निवडून देण्यासाठी मला विधानसभेत पाठवा,असे आवाहनही डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी या सभेत बोलताना केले.

# माझी निवडणूक आता जनतेच्या हातात : क्रीडामंत्री संजय बनसोडे



उदगीर / प्रतिनिधी :- गेली पाच वर्षे मी या भागातील जनतेचा लोकप्रतिनिधी म्हणून प्रामाणिकपणे सेवा केली आहे. मी केलेल्या कामाची दखल घेऊन मतदारसंघातील जनतेनेच माझी निवडणूक आपल्या हातात घेतली असल्याने मला आता कशाचीही भिती वाटत नाही. माझा माझ्या जनतेवर पूर्ण विश्वास असुन ते विरोधकांच्या भुल थापांना बळी न पडता उदगीरच्या विकासासाठी ते मला आशिर्वाद देतील असा विश्वास व्यक्त करून राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांनी विरोधक अफवा पसरवीत असून त्याला कोणीही बळी पडू नये असे आवाहन केले. उदगीर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांनी आपल्या गावभेट दौऱ्यात हैबतपुर, लोहारा, करडखेल, वायगाव, सताळा, शंभू उमरगा सह अनेक गावातील ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी जि. प. सदस्य अ‍ॅड. बस्वराज पाटील कौळखेडकर, पंडित सूर्यवंशी, शिवशंकर धुप्पे, सुदर्शन मुंडे, शंकर रोडगे, सुनील केंद्रे, बाबासाहेब पाटील हेरकर, तुळशीराम बेंबडे , राज तवंडे, सुदर्शन माने, केशव कांबळे, दिलीप गायकवाड, गणराज जाधव, दत्ता बुरले, बाबुराव आंबेगावे, लक्ष्मण जाधव, युवराज कांडगिरे, आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना ना. संजय बनसोडे म्हणाले की, जनतेच्या आशिर्वादाने पाच वर्षांपूर्वी आमदार झालो , मंत्री झालो. या पाच वर्षात या पदाच्या माध्यमातून उदगीर मतदारसंघाच्या विकासाचा मास्टर प्लॅन तयार करून विकासापासून कोसोदूर असलेल्या मतदारसंघाचा चौफेर विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. कुठल्याही भागातील दळणवळण व्यवस्था मजबूत असली की विकास अधिक गतीने होतो हे लक्षात घेऊन या मतदारसंघात राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व अंतर्गत रस्त्याचे जाळे निर्माण केले. प्रत्येक गावात घराघरात नळ देण्यासाठी प्रयत्न केला. आरोग्यासोबत सिंचनाची व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या जीवनात अर्थिक क्रांती केली आहे. उदगीर जिल्हानिर्मिती साठी आवश्यक त्या सुविधा प्राप्त केल्या असून उदगीर जिल्हा केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नसल्याचे सांगत ना. बनसोडे यांनी आपण सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले. मी पाच वर्षे जे काम केलं त्या जोरावर मला मत मागण्याचा अधिकार असून आता माझी निवडणूक लोकांनीच हातात घेतली असल्याने मला विजयाची खात्री आहे असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी विविध गावात ना.संजय बनसोडे यांचे माता भगिनींनी औक्षण करुन विजयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध गावचे सरपंच, चेअरमन, महिला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी हैबतपुर, लोहारा, करडखेल, महादेववाडी, करवंदी तांडा, करवंदी, शंभूउमरगा, वायगाव, सताळा, कुंभारवाडी, डिग्रस, गणेशवाडी, जंगमवाडी, हेर आदीसह विविध गावात भेटी दिल्या.

# भाजपा महायुतीचे उमेदवार आ, संभाजीराव पाटील निलंगेकर याना कोळी महासंघाचा जाहीर पाठिंबा



निलंगा / प्रतिनिधी :-निलंगा विधानसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांना कोळी महासंघा चा जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे .जाहीर पाठिंब्याचे पत्र कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार रमेश दादा पाटील यांनी कोळी महासंघाचे पदाधिकार युवा अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीच मच्छीमार सेलचे प्रदेश अध्यक्ष चेतन पाटील उपाध्यक्ष शिवशंकर फुले, सहसचिव सतीश धडे, मराठवाडा संपर्कप्रमुख गोविंद शोधले, जिल्हाध्यक्ष पंडित हुलसुरे, युवा जिल्हाध्यक्ष संजय राजवडे, जिल्हा उपाध्यक्ष इंद्रजीत यादगिरी, आदी नेते व कार्यकर्त्या मार्फत भाजपा प्रदेश सरचिटणीस युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर याना देण्यात आले निलंगा विधानसभेचे भाजपा महायुतीचे उमेदवार माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांना जाहीर पाठिंब्याचे देण्यात आला . कोळी महासंघाचे अध्यक्ष आमदार रमेश दादा पाटील यांनी आपल्या जाहीर पाठींब्याच्या पत्रात असे नमूद केले आहे की,

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ करता महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून आपणास उमेदवारी मिळाल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले, कोळी समाजाची शिखर संस्था असलेल्या व महायुतीचा घटक असलेल्या कोळी महासंघ या संघटनेच्या वतीने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ करता आपणास जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे. आपल्या विधानसभा क्षेत्रातील कोळी महासंघाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांना आपण आपल्या प्रचारामध्ये सामावून घेऊन त्यांना सन्मान करून सन्मानाची वागणूक द्यावी सर्व कोळी समाज आपल्या प्रचाराचे प्रामाणिक काम करेल तसेच महायुती शासनाच्या काळात घेतलेल्या अनेक कल्याणकारी व लोक उपयोगी निर्णयाची आणि योजनाची माहिती गाव खेड्यात वाडी वस्ती तांड्या वरील सर्वसामान्य कष्टकरी जनतेपर्यंत पोहोचवून आपल्याला विजयी करण्या करिता कोळी महासंघाचे सर्व कार्यकर्ते महत्त्वाची भूमिका बजावतील असा आम्हाला विश्वास आहे.व खात्री आहे. आपल्या मतदारसंघातील आदिवासी कोळी समाज अनेक वर्षापासून जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ रित्या मिळवण्याकरता प्रयत्न करीत असून त्यांना आज रोजी पर्यंत न्याय मिळालेला नाही. त्यामुळे आपण नव्याने होणाऱ्या विधानसभेमध्ये कोळी समाजाच्या जातीच्या दाखल्याचा प्रश्न मांडून हा अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या स्तरावरून प्रयत्न करून कोळी समाजाला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती आमदार रमेश दादा पाटील यानी केलीआहे.व आपण या विधानसभा निवडणुकीमध्ये मोठ्या मताधिकेने निवडून येण्याकरता कोळी महासंघाचा जाहीर पाठिंबा शुभेच्छा दिल्या आहेत. या पत्रावर कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेश दादा पाटील ,कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, सरचिटणीस राजहंस टपके,यांच्या स्वाक्षऱ्या आहेत,

## अल-कायदाच्या टेरर फंडिंग नेटवर्कचा पर्दाफाश

नवी दिल्ली : राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) सोमवार दि. ११ नोव्हेंबर रोजी दहशतवादी संघटना अल कायदाशी संबंधित संशयितांच्या विरोधात देशभरात मोठ्या प्रमाणावर शोध मोहीम राबवली. या कारवाईअंतर्गत जम्मू-काश्मीर, कर्नाटक, पश्चिम बंगाल, बिहार, त्रिपुरा आणि आसामसह नऊ ठिकाणी छापे टाकण्यात आले.
एनआयएची ही कारवाई दहशतवादाबाबत देशाची सुरक्षा आणि संरक्षण धोरण मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. छापेमारीत टेरर फंडिंगशी संबंधित अनेक डिजिटल उपकरणे, बँकिंग कागदपत्रे आणि पुरावे समोर आले आहेत.

## संपादकीय....

# ‘तेच ते’ बदलण्याची संधी

विंदा करंदीकरांची ‘तेच ते नि तेच ते’ नावाची गाजलेली कविता आहे. एका दिवसापुरते का होईना, ही ‘ आपली तीच ती’ ओळख विसरण्याची संधी मतदारांना मतदानाच्या दिवशी मिळत असते, सामान्यांचे तेच ते पण अनेक बाबतीत दशकानुदशके कायम असते. सर्वसामान्य माणसांच्या घरातल्या एखाद्या ‘लाडक्या बहिणी’च्या मोबाईलवर खात्यात दीड हजार रुपये पडल्यानंतर आलेला मेसेज सोबत आनंद घेऊन आलेला असतो, ‘लाडक्या भावाच्या’ बाबतीत हा आनंद महिनाभर काम करून महिन्याच्या एक तारखेला खात्यात पगाररुपी आनंदाशी करता येऊ शकतो, असो, विषय लाडक्या बहिणींचा आहे, या लाडक्या बहिणीलाही हे दीड हजार रुपये कुठं आणि कसे खर्च करावेत, हा यक्षप्रश्न दर महिन्याच्या विशिष्ट तारखेला पडतच असावा, चूलशेगडी, रेशन, सिलिंडर्स, रॉकेल, धान्य, तेलपाणी, भाजीपाला, मीठ मिरची, मुलांची शिक्षणं, पै पाहुणे, घरातले छोटे मोठे सण समारंभ, नातेवाईकांच्या भेटीगाठी असं बरंच काही.

एखाद्याच्या लग्नात दीड हजारांचा आहेर घेतल्यानंतर तो तेवढ्याच प्रमाणात पाकिटात घालून त्यांना परत करायचा असतो. त्यामुळे दीड हजार रुपयांमध्ये काय काय करावं?, काय करू नये?, यासाठी मोठं आर्थिक नियोजन करावं लागतं. शंभरच्या १५ नोटा असल्यास उगाच खिसा भरल्यासारखा वाटण्यातही सामान्यांना आनंद असतो, म्हणून दीड हजार रुपये खात्यातून काढताना शंभरच्या नोटाच लाभार्थ्यांना देण्यात याव्यात, असाही नियम ‘देणार्यांनी’ करायला हरकत नाही. दीड हजार रुपयांमध्ये जर पाचशेच्या तीनच नोटा असतील तर अशा तीनच नोटा तातडीने संपण्याचा धोकाही असतो. सर्वसामान्यांना खिसा भरल्यासारखा वाटणं आनंद देणारं असतं, म्हणूनच एखाद्या लक्षाधीश किंवा कोट्यधीशांच्या तुलनेत सामान्यांचं पैशांचं पाकीट नेहमी फुगलेलं असतं.

नावाला एखादी खर्च न करता येणारी अशी जुनी ७८६ क्रमांकाची नोट सामान्यांच्या पाकिटात असते. काही बिलं, रेल्वेचे जुने संपलेले पास, सोसायटीच्या पावत्या, बाजार, वाणसामानाची यादी असं सगळं काही भरून पाकिटाला ही ‘ आनंदाची सूज’ आणली जाते. या सूजेलाच तो बळसे समजत असतो. भारतीयांमधल्या सामान्यांचे सामान्य, उपसामान्य, अतिसामान्य, निर्विवाद सर्वसामान्य, सहनशील सर्वसामान्य असे कित्येक प्रकार समाज नावाच्या गर्दीत वावरत असतात. सुखी माणसाच्या सदर्याला खिसा नसतो, मात्र सामान्य माणसाच्या सदर्याला अनेक खिसे असतात, नोकरी, किरकोळ व्यवसायात जास्त आवक नसेल तरी हरकत नाही, मात्र खिसे जास्त असल्यास उगाच हे खिसे आज किंवा उद्या भरले जातील, ही उमेद अशा विविध गटात मोडणार्या सामान्यांना ऊर्जा देऊन जगवत असते.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर याच उमेदीच्या ऊर्जेला हवा देण्याचं काम राजकारण्यांकडून केलं जातं. पैसे नसले म्हणून काय झालं? खिसे मोठे असायला हवेत, हे तत्वज्ञान गरिबी असली तरी काय झालं? मनाची श्रीमंती हवी, या तत्वज्ञानाशी समांतर जाणारं म्हणूनच असतं. उमेदवारांनी तसेच राजकारण्यांनी केलेल्या चुकांना पोटात घालून मतदारराजाने त्यांना माफ करावं, अशी अपेक्षा उमेदवारांची असते, खरीखुरी श्रीमंती राबवायला आम्ही आहोतच की, नागरिकांनी नावापुरतं मतदार राजा व्हावं आणि मनाची श्रीमंती मिरवावी, अशी अपेक्षा राजकारणाची असते. मग निवडणुकीच्या काळात मतदाराला तो ‘राजा’ असल्याचा साक्षात्कार करून दिला जातो. त्याचं आणि त्याच्यासाठी राबवलेल्या लोकशाहीचं कौतुक केलं जातं, त्याच्यासाठी संविधानातल्या उतार्यांची पारायणं केली जातात.

मतदान कसं सर्वश्रेष्ठ दान आहे, ते आपल्याच पदरात टाकलं जावं यासाठी भाषणांच्या स्पर्धा सुरू होतात. हे सगळं दर पाच वर्षांनी थोड्याफार फरकानं सारं काही ‘तेच ते’ असतं, लोकशाहीचा निवडणुका नावाचा हा उत्सव स्वातंत्र्यापासून ‘त्याच त्या’ मुद्यांवर आजपर्यंत साजरा केला गेला आहे. महाराष्ट्रातल्या आजपर्यंतच्या निवडणुकांमधले मुद्देही तेच ते आहेत. त्यामुळे रिंगणात असलेल्या पक्षांचे जाहीरनामेही ‘तेच ते’ आहेत, बदललेले नाहीत, महिलांना संपूर्ण सुरक्षा, घरगुती गॅस सिलिंडर्सच्या किमती, जीवनावश्यक वस्तूंचे स्थिर भाव हेच विषय दर पाच वर्षांनी येणार्या निवडणुकांमध्ये महत्त्वाचे असतात, भूक, गरिबी, आरोग्य, शिक्षण, रोजगार हेच विषय मागील ८० वर्षात देशाच्या लोकशाहीच्या स्थापनेपासून कायम आहेत, सामान्य मतदारही त्याला पुरता सरावला आहे, ‘हे असंच चालू असतं’ हीच त्याची लोकशाहीची धारणा त्याच्या आजपर्यंतच्या राजकारणातल्या निराश भवतालने केलेली आहे, मात्र सामान्यांमध्ये कमालीचा आशावाद असतो, अंधाराला प्रकाशाची ओढ असणे हे नैसर्गिक मानले जाते. म्हणूनच सामान्य माणूस या निराशेतूनही दर पाच वर्षांनी आशावादाची किरणे शोधत असतो.

किती प्रतिकूल परिस्थिती असली तरी त्याची उमेद आणि लोकशाहीवरचा विश्वास कायम असतो. म्हणूनच एक दिवसापुरता असलेला मतदार राजा आपले राजबिंडेपण बाजूला ठेवून इतर राजांसोबत मतदानाच्या रांगेत उभा राहतो आणि मतदान करतो. इतर दिवशी बर्यापैकी रिकाम्या असलेल्या त्याच्या पाकिटात तो मतदार ओळखपत्रासाठी पुरेशी जागा करतो. गरजू, दारिद्र्यरेषेखालील किंवा वरील, अमूक-तमूक जातीचा, धर्माचा, मागास, अतिमागास, खुल्या गटातला, स्त्री किंवा पुरुष, पिवळ्या, केशरी, पांढर्या रेशनकार्डाचा अशी विविधांगी ‘तीच ती’ ओळख असते, मतदानाच्या दिवशी ही ओळख केवळ नागरिक अशी एकच होते, त्यातूनच ‘तेच ते’ बदलण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

# ईडीची भक्ती मुक्तीसाठीच!




माणूस जन्म-मृत्यूच्या फे-यातून सुटका व्हावी म्हणून भक्तिमार्गाला लागतो. काहीजण पापातून मुक्त व्हावे म्हणून ईश्वरभक्ती करतात. मुळात पाप करायचेच कशाला हा प्रश्न आहे. परंतु माणसाची चंचल वृत्ती त्याला गप्प बसू देत नाही, मग मोहात पडणे वगैरे गोष्टी होतात. राजकीय व्यक्तींना भ्रष्टाचार नेहमीच खुणावत असतो. एकदा का तो भ्रष्टाचाराच्या मोहात पडला की त्यातून त्याची सुटका होणे कठीणच असते. मग त्यातून सुटका करून घेण्यासाठी तो धडपडत राहतो. राज्याचे नागरी आणि अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची सध्या अशीच अवस्था झाली आहे.

तपास यंत्रणांचा ससेमिरा चुकवण्यासाठी त्यांची धडपड सुरू झाली. ईडीच्या कारवाईतून मुक्त होण्यासाठी आपण भाजपबरोबर गेलो असे त्यांनी म्हटले आहे. मी ओबीसी असल्याने माझ्यावर कारवाई करण्यात आली, मी उच्चवर्णीय असतो तर ही कारवाई झाली नसती असेही ते म्हणाले. भुजबळ यांचे हे वक्तव्य हास्यास्पद आणि बालिश म्हणावे लागेल. कारण तुम्ही गुन्हाच केला नसता अथवा घोटाळा केला नसता तर ईडी तुमच्या मागे लागलीच नसती. ‘कर नाही तर डर कशाला’ असे म्हटले जाते. तुम्ही काही केले नसेल तर भीती कशाची? मूळ पक्ष सोडून आपण भाजपच्या आश्रयाला गेलो तर आपले सारे गुन्हे माफ होतील हे तुम्हाला माहीत होते. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपबरोबर महायुती सरकारमध्ये सहभागी झाल्याचा आनंद पक्षाच्या सर्वच नेत्यांना झाला होता.

कारण त्यामुळे ईडीपासून सुटका झाली. माझ्यासाठी तर ईडीपासून सुटका म्हणजे एकप्रकारे पुनर्जन्मच होता अशी कबुली भुजबळ यांनी दिली. दोन वर्षांपूर्वी अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचा हात सोडला आणि प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, सुनील तटकरे आदींसह भाजपच्या आश्रयाला गेले. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेसंदर्भात जे केले तेच अजित पवार यांनी राष्ट्रवादीशी केले. एकनाथ शिंदे यांच्या अनेक साथीदारांप्रमाणे अजित पवार यांच्या साथीदारांवर विविध आरोप होते. काही जणांवर केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाया सुरू होत्या. अजित पवार हेही ईडीच्या रडारवर होते. भुजबळ दोन-अडीच वर्षे तुरुंगात होते. जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांना ईडीची पुन्हा नोटीस आली होती. भाजपबरोबर हातमिळवणी केल्याशिवाय सुटका नाही हे लक्षात आल्यामुळे भाजपबरोबर जाण्याचा निर्णय भुजबळांनी घेतला.

भाजपबरोबर जाण्याने ईडीच्या जाचापासून सा-यांची सुटका झाली अशी भावना भुजबळ यांनी व्यक्त केली आहे. भुजबळ यांनी हा सारा तपशील राजदीप सरदेसाई यांच्या ‘२०२४ : द इलेक्शन दॅट सरप्राईज्ड इंडिया’ या पुस्तकात नोंदवला आहे. ‘हमारे साथ ईडी है’ या प्रकरणात त्यांनी राज्यातील राजकारण आणि पक्ष फोडाफोडीच्या राजकारणामागील सत्य कथन केले आहे. भुजबळांचे वक्तव्य प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचे पडसाद राज्यभर उमटले. भुजबळांनी तातडीने पत्रकार परिषद घेत ईडी चौकशीमुळे नव्हे तर विकासासाठी सत्तेत सहभागी झालो अशी सारवासारव करत घूमजाव केले. आपण कसलीही मुलाखत दिलेली नाही. राजदीप सरदेसाई यांचे पुस्तक वाचलेले नाही, त्यामुळे पुस्तकात काय प्रसिद्ध झालेले आहे ते आपल्याला माहीत नाही. निवडणुकीच्या धामधुमीत लक्ष विचलित करण्याची ही कृती असेल असे भुजबळांनी म्हटले आहे.

छगन भुजबळ यांनी अशा आशयाची कोणतीही मुलाखत दिलेली नाही. निवडणुकीच्या काळात महत्त्वाचे प्रश्न बाजूला ठेवून चुकीचे कथानक रचण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशी भुजबळांची पाठराखण करताना अजित पवार यांनी तरफदारी केली आहे. छगन भुजबळ यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे तेच पुस्तकात आहे. राजकारणात मला काही रस नाही. पत्रकार, लेखक या नात्याने जी वस्तुस्थिती आहे ती मी पुस्तकात मांडली आहे. अशी प्रतिक्रिया राजदीप सरदेसाई यांनी दिली आहे. ईडीच्या चौकशीचा ससेमिरा आणि पुन्हा अटक टाळण्यासाठी भाजपच्या आश्रयाला गेलो अशी स्पष्ट कबुली भुजबळ यांनी दिली आहे. प्रफुल्ल पटेल यांची काही मालमत्ता जप्त करण्यात आली होती. अजित पवार यांच्यावरही ईडीची टांगती तलवार होती. या चौकशीत सुनेत्रा पवार यांनाही अटक होण्याची शक्यता होती.

म्हणून भाजपसोबत जावे आणि या चौकशा थांबवाव्यात अशी गळ शरद पवार यांना घालण्यात आली होती. परंतु शरद पवार यांनी नकार दिल्याने अजित पवार यांनी बंड केले. अजित पवार गटाला भाजपने शुद्ध करून घेतले आहे हे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर स्पष्ट झाले आहे. कुठल्याही पक्षात राजकीय नेते धुतल्या तांदळासारखे नसतात हे सिद्ध झाले आहे. केंद्र सरकार सांगेल तेव्हा ईडी एखाद्या संस्थेची वा व्यक्तीची चौकशी करते अथवा चौकशी गुंडाळून ठेवते हे या निमित्ताने उघड झाले आहे. सत्तेत असलेल्या भुजबळ यांनी दबावामुळे बंड केल्याची जाहीर कबुली दिली आहे. त्यांच्या खुलाशामुळे भाजपचा आणि केंद्र सरकारचा बुरखा फाटला आहे. भुजबळ यांनी कोणताही गुन्हाच केला नसता तर त्यांना पक्ष सोडायची गरजच भासली नसती. परंतु त्यांच्या कबुलीमुळे केंद्र सरकारचेही पितळ उघडे पडले आहे. केंद्राच्या सांगण्यावरून ईडीने काही ठराविक आमदार, खासदार व मंत्र्यांवर खोटे गुन्हे दाखल केले हे उघड झाले. भुजबळ यांच्या वक्तव्यामुळे तपास यंत्रणांचा गैरवापर उघड झाला आहे.

ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग या यंत्रणांचा वापर करून विरोधकांना जेरीस आणण्याचे काम केंद्र सरकार करत आहे. अजित पवार यांच्यासह त्यांच्या पक्षाचे आमदार विकास आणि राज्याच्या हितासाठी भाजपबरोबर गेले नसून कारवाई टाळण्यासाठी सत्तेत जाऊन बसले आहेत हे उघड आहे. ईडीपासून मुक्ती मिळावी यासाठीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी अजित पवारांच्या नेतृत्वाखाली भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतला यात शंका नाही. भुजबळ यांनी साळसूदपणाचा कितीही आव आणला तरी अखेर सत्य लपून राहत नाही, उलट ते त्यांच्याच मुखातून बाहेर पडले. डोळे मिटून दूध पिल्याने जगाला ते दिसणार नाही असे वाटत असले तरी जगाला ते ढळढळीतपणे दिसत असते!

# पुन्हा कोण येणार?

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला दहा दिवसांचा कालावधी बाकी असतानाच आणि त्यानंतर तीन दिवसांच्या कालावधीमध्येच मतदारांनी कोणाच्या हातात सत्ता दिली आहे, हे उघड होणार असतानाच राज्यात पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाची चर्चा रंगली आहे. रविवारी अमित शहा यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत निकालानंतर महायुतीतील तिन्ही पक्षांसोबत चर्चा केली जाईल असे म्हटले. २०१९च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या कालावधीमध्ये भाजपाचा प्रचार करत असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ‘मी पुन्हा येईन’ ही घोषणा गाजली होती आणि त्यानंतर त्यावर टीकाही झाली होती.

पण आता राज्यात सध्या मुख्यमंत्रिपदाचे एवढे दावेदार आहेत की मुख्यमंत्री पदावर नक्की कोण पुन्हा येणार याबाबत अद्यापही सस्पेन्स कायम आहे. भाजपाचे चाणक्य आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात जाहीर प्रचार सभेत बोलत असताना महाराष्ट्राचे आगामी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच असतील, अशी घोषणा केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा प्रचाराच्या व्यासपीठावरून बोलताना देवेंद्र फडणवीस यांना खास गिफ्ट दिले जाईल असे संकेत दिले होते.

दुसरीकडे, भाजपचे नेते विनोद तावडे यांनी एका माध्यम समूहाला मुलाखत देत असताना भाजपमध्ये ज्या नावाची चर्चा असते ते नाव कधीच मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचत नाही, अशा प्रकारचे विधान केले होते. अर्थात, हे विधान त्यांनी स्वतःबाबतीत केले असे सांगण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांनी मात्र निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच आपल्याला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होण्यामध्ये कोणताही रस नाही. आम्ही ही निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच लढवणार आहोत, अशी घोषणा केली होती.

महायुतीमध्ये मुख्यमंत्रिपदाबाबत अशा घडामोडी सुरू असताना महाविकास आघाडीचा प्रमुख घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ज्या पक्षाला जास्त जागा मिळतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल अशी घोषणा पुन्हा एकदा केली आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करावा अशी मागणी लावून धरली होती. पण काँग्रेस आणि शरद पवार या दोघांनीही उद्धव ठाकरे यांच्या या मागणीकडे लक्ष दिले नव्हते.

आता तर शरद पवार यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये ज्या पक्षाचे जास्त आमदार निवडून येतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल अशी भूमिका जाहीर केली आहे. काँग्रेस पक्षाचा विचार करता त्यांनी आतापर्यंत कधीच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा समोर ठेवून निवडणूक लढलेली नाही. गेल्या काही कालावधीमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये कोठेही काँग्रेसने आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर केला नव्हता. महाराष्ट्र विधानसभेसाठीसुद्धा काँग्रेसने या नियमाला अपवाद केलेला नाही. ज्या पक्षाच्या जास्त जागा निवडून येतील त्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री होईल ही शरद पवार यांची भूमिका त्यांनीही लावून धरली आहे.

महाराष्ट्रातील विद्यमान राजकीय चित्रावर जर नजर टाकली तर अनेक आजी-माजी मुख्यमंत्री या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण या सर्वांनी आतापर्यंत मुख्यमंत्रिपदाचा अनुभव घेतला आहे आणि सर्वजण निवडणूक लढवत आहेत. विधानसभा निवडणूक न लढवणारे पण मुख्यमंत्रिपदाचा अनुभव असणारे अशोक चव्हाण, सुशीलकुमार शिंदे आणि उद्धव ठाकरे हे माजी मुख्यमंत्रीसुद्धा राजकीय पटलावर कार्यरत आहेत.



उद्धव ठाकरे विधान परिषदेचे सदस्य असल्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपद स्वीकारण्याबाबत त्यांना कोणतीच अडचण येणार नाही, असेही सातत्याने सांगितले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जरी अद्यापपर्यंत मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचता आले नसले तरी यावेळी त्यांनी चर्चा आणि तयारी सुरू केली आहे. शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी इस्लामपूर येथे जाहीर सभेत बोलत असताना जयंत पाटील यांना सर्वात मोठी जबाबदारी मिळू शकते, असे संकेत दिले होते. म्हणजेच मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये जयंत पाटील यांचेही नाव आता समाविष्ट झाले आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीसुद्धा काही दिवसांपूर्वी मीसुद्धा मुख्यमंत्री होऊ शकतो, अशा आशयाचे विधान केले होते. म्हणजेच एकीकडे राजकीय पक्षांचा प्रचार सुरू असताना दुसरीकडे मुख्यमंत्रिपदाची फिल्डिंगसुद्धा लावली जात आहे. सुमारे अडीच वर्षांपूर्वी जेव्हा शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हासुद्धा ती आश्चर्यकारक घटना मानण्यात येत होती. कारण देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री होतील आणि एकनाथ शिंदे यांचा गट त्यांना पाठिंबा दिईल, असे वाटत असतानाच अचानक एकनाथ शिंदे यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी पुढे करण्यात आले होते.

अशाच प्रकारचा प्रयोग बिहार विधानसभा निवडणुकीनंतर भाजपने नितीशकुमार यांच्याबाबतही केला होता. नितीशकुमार यांच्या पक्षाला कमी जागा मिळूनही भाजपाने त्यांना मुख्यमंत्रिपद बहाल केले होते. साहजिकच महायुतीपुरता विचार करता ज्याच्या जागा जास्त त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईलच असे कोणतेही समीकरण महायुतीच्या नेत्यांनी मांडलेले नाही. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवत असून निवडणुकीनंतर पुन्हा एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री होतील असे सातत्याने भाजपचे नेते सांगत असले, तरी अमित शहा आणि नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विधानामुळे मात्र वेगळा अर्थ निघत आहे.

साहजिकच देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे नेते यावेळच्या प्रचार सभांमध्ये ‘मी पुन्हा येईन’ अशा प्रकारच्या घोषणा जरी करत नसले किंवा इतर कोणत्याही राजकीय पक्षाचे नेते स्वतःला किंवा आपल्या पक्षातील इतर नेत्याला मुख्यमंत्री म्हणून प्रोजेक्ट करत नसले, तरी प्रत्येकालाच हे पद हवे आहे हे गुपित लपून राहिलेले नाही. अर्थात, राजकीय पक्षांनी किंवा त्यांच्या नेत्यांनी कितीही घोषणा केल्या आणि स्वप्ने पाहिली तरी राज्याच्या मुख्यमंत्रिपदी कोण येणार हे सर्वसामान्य मतदारच ठरवणार आहेत. त्यासाठी २३ नोव्हेंबर रोजी होणार्या मतमोजणीची वाट पहावी लागणार आहे.

# महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांना मतदार केलेल्या कामाची, संघर्षाची पावती देणार !







लातूर :- गेली १५ वर्षांपासून रेणापूर मतदारसंघाची पुनर्ररचना होऊन लातूर ग्रामीण मतदार संघ तयार झाला. तेव्हापासून आजपर्यंत या लातूर ग्रामीणमध्ये कॉंग्रेसचे आमदार निवडून आले. पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आलेले आदरणीय वैजनाथदादा शिंदे हे आजही सर्वसामान्यांचे आमदार म्हणून ओळखले जातात. स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी २१ वर्षांपूर्वी या मतदार संघाची जबाबदारी मा.रमेशआप्पा कराड यांच्या खांद्यावर दिली. तेव्हापासून आजपर्यंत मा.रमेशआप्पा कराड साहेबांनी लातूर ग्रामीण मधील रेणापूरच नाही तर कॉंग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मांजरा पट्ट्यामध्ये पण सर्वसामान्य कार्यकर्त्यांना बळ देऊन भारतीय जनता पार्टीची ताकद वाढवण्याच काम केल.

रमेशआप्पा कराड साहेबांनी २००९ व २०१४ साली निवडणूक लढवली. या दोन्ही निवडणुकीत हजारो मते घेत रमेशआप्पा यांनी कौतुकास्पद कामगिरी केली. २०१४ नंतर परत रमेशआप्पा यांनी मोठा संघर्ष उभा करुन पक्ष वाढीसाठी मोठं कार्य केल आणि शेकडो कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत बळ देऊन निवडून आणलं. रमेशआप्पा यांची संपूर्ण मतदार संघामध्ये दिवसेंदिवस लोकप्रियता वाढू लागली, सर्व जाती धर्मातील कार्यकर्ते जोडत गेले. २०१९ च्या निवडणुकीपूर्वी रमेशआप्पा यांनी संपूर्ण मतदार संघाचा दौरा करत सर्व गाव, वाडी, वस्ती पिंजून काढला. रमेशआप्पा पुन्हा निवडणुक लढऊन जिंकण्याची दाट शक्यता असताना विरोधकांनी डाव टाकत हा मतदार संघ उद्धव ठाकरे यांना मॅनेज करुन शिवसेनेला सोडण्यात आला. संपूर्ण मतदारसंघातील मतदारांमध्ये तीव्र नाराजीची लाट निर्माण झाली असताना कॉंग्रेसच्या आमदारांच्या विरोधात आणि रमेशआप्पा कराड यांच्या समर्थनार्थ शिवसेना उमेदवारापेक्षा जास्त नोटाला २७ हजार ७०० मते मिळाली आणि ऐतिहासिक मतदानाची नोंद झाली.

२०१९च्या निवडणुकीत रमेशआप्पा यांच्यावर झालेला अन्याय आणि नोटाला मिळालेली मते याचा प्रभाव त्यांना मिळालेले भाजपाचे जिल्हाध्यक्ष पद आणि लगेच ६ महिन्यानंतर विधानपरिषदेवर मिळालेली संधी यातूनचं दिसून आला. त्यानंतर पुन्हा एकदा लातूर ग्रामीणमधील सर्वसामान्य कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्यामध्ये मोठा उत्साह वाढत गेला आणि पुन्हा रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात पक्षाची ताकद वाढली.

दोन वेळचा पराभव आणि तिसऱ्या वेळेस तिकिटात झालेली गद्दारी ही खरंच एखाद्या राजकारणी नेत्याला न पचवणारीच म्हणावी लागेल. पण रमेशआप्पा या नेतृत्वात खुप मोठा संघर्ष आणि संयम हे त्यांच्या नेतृत्वगुणातुन लातूर ग्रामीणमधील जनतेला दिसून आला. एवढी संकटे आलेला नेता कधीही खचला नाही, थांबला नाही, कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडला नाही. हाच रमेशआप्पा यांच्यातील गुण सर्वसामान्य कार्यकर्त्यांना भावतो.

राजकारण फक्त आमदार होण्यासाठी किंवा सत्तेसाठी हा स्वार्थ रमेशआप्पा कराड यांच्यात कधीच दिसून आला नाही. विधानपरिषदेवर मिळालेल्या संधीचा वापर मतदार संघातील सर्वसामान्य जनतेसाठी कसा केला जातो याच उत्तम उदाहरणं म्हणजे रमेशआप्पा. मतदार संघातील प्रत्येक गावामध्ये रमेशआप्पा कराड यांनी मंदिर, सभागृह, रस्ते यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी देऊन प्रत्येक गावातील विकासात भर टाकली.

गेल्या ४ वर्षाच्या आमदारकीतून आणि २० वर्षाच्या संघर्षातून रमेशआप्पा कराड साहेबांनी आज प्रत्येक गावातील जनतेसोबत जवळीकतेच नातं निर्माण केल आहे. विधानसभेचं मतदान काही दिवसावर आल आहे मतदार संघातील सर्वसामान्य जनता आजही रमेशआप्पा कराड यांच नाव घेत आहे. विरोधी आमदारापेक्षा रमेशआप्पा हे सतत सर्वसामान्य जनतेच्या कायम संपर्कात राहतात, जनतेला सहज उपलब्ध होतात हीच चर्चा आज सर्वसामान्य मतदार करत असून, त्यांच्याबद्दल जनता मनातून सहानुभूती दाखवत त्यांनी केलेल्या कामावर समाधान व्यक्त करत आहे. हीच रमेशआप्पा यांच्या कार्याची, त्यांच्या संघर्षाची पावती आहे. म्हणूनच हे नेतृत्व लातूर ग्रामीणच्या राजकारणात कायम राहणं गरजेचं आहे.

येणाऱ्या २० तारखेला लातूर ग्रामीणमधील जागरूक, सुशिक्षित, सर्वसामान्य मतदार कुठल्याही भुलथापाला बळी न पडता मा.रमेशआप्पा कराड साहेबांच्या अथक संघर्षाला आणि त्यांच्या विकासकामाला नक्कीच मतदानरुपी साथ आणि आशीर्वाद देतील ही अपेक्षा...!

## रामेश्वर येथील संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे आज रोलर पूजन

लातूर दि.११ - रामेश्वर परिसरात शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी दिमाखाने उभा राहत असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या कारखान्याचा रोलर पूजनचा कार्यक्रम मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असून या स्वप्नपूर्तीच्या कार्यक्रमास शेतकरी ऊस उत्पादक आणि कारखान्याच्या एकत्र चिंतकाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

सातत्याने संकटात, अडचणीत सापडत असलेल्या शेतकरी बंधूंना त्यातून मार्ग काढता यावा, मदत करता यावी यासाठी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार रामेश्वर परिसरात संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याची अंतिम टप्प्यात आली असून गाळपासाठी सज्ज होत आहे ही बाब आपल्या सर्व शेतकऱ्यांसाठी अत्यंत आनंददायी असून या कारखान्याचा रोलर पूजनचा कार्यक्रम गातेगाव येथील परमपूज्य विद्यानंद सागर महाराज यांच्या शुभहस्ते मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी ह भ प बाबा महाराज बोराडे काडगावकर, ह भ प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर आणि ह भ प लालासाहेब पवार देवळेकर हे शुभ आशीर्वाद देणार आहेत तर माजी सनदी अधिकारी शंकरआप्पा भिसे आणि ज्येष्ठविधीज्ञ अँड बळवंतभाऊ जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सदरील कार्यक्रम दिंडेगाव रोडवरील रामेश्वर परिसरातील कारखाना साईटवर होणार असून कारखान्याच्या माध्यमातून स्वाभिमानी शेतकऱ्यांची स्वप्नपूर्ती प्रत्यक्षात पूर्ण होत आहे तेव्हा कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी ऊस उत्पादक भागधारक आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर इंडस्ट्रीज या साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीराम दादाराव कराड आणि चेअरमन राजेश काशीराम कराड यांनी केले आहे.

## भाजपाच्या माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांनी त्यांच्या स्वार्थासाठी कार्यकर्त्यांना सोडले वाऱ्यावर !!

### संगीता ठोंबरे यांच्या सर्वच समर्थकांचा महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांना जाहीर पाठिंबा. काकांजींची शिष्टाई यशस्वी !!

केज / प्रतिनिधी :-भाजपाच्या माजी आमदार संगिता ठोबरे यांच्या उमेदवारीसाठी आग्रही असलेल्या व एकाही समर्थकाला विश्वासात न घेता निवडणुकीतून माघार घेतल्याने नाराज झालेल्या हजारो समर्थकांनी भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या उपस्थितीत आज रविवार दि. १० रोजी होळ येथे पार पडलेल्या बैठकीत केंज विधानसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवारं आमदार नमिता मुंदडा यांना जाहीर पाठींबा दिल्याने नमिता ताई मुंदडा यांच्या विजयाचा मार्ग सरळ मोकळा झाला असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर होताच आमदार नमिता मुदडा यांच्या विरोधात निवडणूक लढविण्यासाठी अनेकजण इच्छुक होते, त्यातच भाजपाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यानी भाजपाकडून विद्यमान आमदाराना उमेदवारी मिळणार असल्याचे पाहून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले होते परंतू, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने निष्ठावंत असलेल्या पृथ्वीराज साठे याना उमेदवारी दिली. त्यामुळे संगिता ठोंबरे यानी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. परंतु उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेत पृथ्वीराज साठे यांना पाठींबा दिला. त्यामुळे त्यांची पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाली. हा निर्णय घेताना त्यानी कोणालाही विश्वासात न घेतल्याने नाराज झालेल्या त्याच्या समर्थकांनी अखेर रविवारी विजय बापू केंद्रे यांच्या शेतात नंदकिशोर काका यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नमिता मुंदडा यांना पाठींबा जाहीर केला आहे.यावेळी माजी उपसभापती नेताजी शिंदे, महादेव सुर्यवंशी, सुनील भाऊ घोळवे,सुधाकर लांब, माऊली इंगळे, विकास करपे, साहेबराव नवगिरे, अरूण करपे, दिपक भाकरे ,दत्ता लाड,रणजित, कृष्णा करपे, अंकुश शिंदे, कैलास सोनवणे,दत्ता शेप, सचिन तोडकर विभीषण शिंदे, शिवरूद्ध आकुसकर, संजय देशमुख, नितिन बनसोडे,माऊली शिंदे, नारायण धस, उत्तम धस,संदीप गायकवाड,दिपक नाईकवाडे,यांच्या सह बहुतांश संगिता ठोंबरे यांचे समर्थक कार्यकर्ते उपस्थित होते.



## मा.भारत निवडणूक आयोगाने मतदारांना मतदान केंद्रावर १० पैकी एक पुरावा देणे आवश्यक; निवडणूक निर्णय अधिकारी दीपक वजाळे यांनी केले मतदारांना आवाहन

केज/प्रतिनिधी - मा. भारत निवडणूक आयोगे यांचे निर्देशानुसार २३२-केज (अ.जा.) विधानसभा मतदारसंघा करिता दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. तरी मतदारांनी मतदान कक्षात मतदानाकरीता जात असताना मा. निवडणूक आयोगाकडील निर्देशानुसार आपल्या ओळखीचा खालीलपैकी कोणताही एक आवश्यक तो मुळ पुरावा सोबत ठेवावा, झेरॉक्स प्रत अथवा सॉफ्ट कॉपी ग्राह्य धरले जाणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.मतदाराने मतदान केंद्रावर येता वेळेस मतदार ओळखपत्र, आधारकार्ड,मनरेगा जॉब कार्ड,
बँक/पोस्टाचे पासबुक, ड्रायव्हींग लायसन, फोटो असलेले पेन्शनचे कागदपत्रे,खासदार/आमदार/विधानसभा सदस्य यांचेकडून देण्यात आलेले ओळखपत्र, भारतीय पासपोर्ट, पॅनकार्ड,
केंद्र/राज्य सार्वजनिक उपक्रम/पब्लिक लिमीटेड सार्वजनिक कंपनीचे ओळखपत्र मतदाराने मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी येताना वरीलपैकी एक पूर्वा सोबत कंपल्सरी आणण्यात यावा अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. तसेच याबाबत मा. जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. अविनाश पाठक यांनी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी श्री. दीपक वजाळे यांनी केज मतदारसंघातील जनतेला वरील पुराव्याच्या आधारे मतदान करण्याचे आवाहन केले आहे.




## जनविकास परिवर्तन आघाडीचा पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा पृथ्वीराज साठे ५० हजार मतांच्या लीडने निवडून येणार-हारुणभाई इनामदार

केज/प्रतिनिधी-जनविकास परिवर्तन आघाडीचा पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. पृथ्वीराज साठे ५० हजारा मतांच्या लीडने निवडून येणार आहेत आज त्यांच्या विजयाचा गुलाल फिक्स झाला आहे असे बोलताना हारुणभाई इनामदार यांनी स्पष्ट केले तर संविधानाच्या विचाराचे सक्षम उमेदवार पृथ्वीराज साठे यांनाच निवडून देणार आहे असा निर्धार नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी केला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, जनविकास परिवर्तन आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्याच्या संवाद बैठकीचे आयोजन केज शहरातील जेके फंक्शन हॉल येथे करण्यात आले होते.

जनविकास परिवर्तन आघाडीचे वरिष्ठ मार्गदर्शक नेत्यांच्या विचारातून व प्रमुख कार्यकर्त्याच्या संवाद मेळाव्यात राष्ट्रवादी शरचंद्र पवार पक्षाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज शिवाजीराव साठे यांना पाठिंबा देण्याचे एकमताने ठराव मंजूर करण्यात आला व महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा दिला आणि त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या मेळाव्यात उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड म्हणाले की, उमेदवारी मिळाली नाही म्हणून रडत बसायचे नसते तर लढायचे असते जो माणूस महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा व संविधानाच्या विचाराचा आणि आपल्या सर्वांच्या विचारांचा असेल तोच माणूस शेतकरी,महिला,विद्यार्थी युवक यांच्या प्रश्नावर काम करणारा व त्यांच्या प्रश्नावर आवाज उठवणारा असावा आणि आपण त्याच उमेदवाराला निवडून द्यायचे आहे तो सर्व विचारांना सोबत घेऊन जाणारा सक्षम उमेदवार म्हणून पृथ्वीराज साठे आहेत म्हणून जन विकास परिवर्तन आघाडीचा त्यांना जाहीर पाठिंबा देण्याचा निर्णय घेऊन त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करून त्यांना निवडून आणण्याचा विडा जनविकास परिवर्तन आघाडीने उचललेला आहे.

सामाजिक कार्यकर्ते तथा प्रवक्ता सिद्धार्थ शिनगारे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले पुढे बोलताना शिनगारे म्हणाले की, संविधान विरोधी भाजप पक्षाच्या उमेदवाराला निवडून देऊ नका परंतु गरीब व सक्षम उमेदवार पृथ्वीराज साठे यांना पाठिंबा देण्यात यावा अशी साद हारुणभाई इनामदार यांना घातली.

यावेळी उपस्थिताना मार्गदर्शन करताना हरूणभाई म्हणाले की, जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांना केज विधानसभेचे उमेदवारी मिळावी म्हणून आम्ही आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे दावेदारी केली व त्यांनी देखील मोठा प्रतिसाद दिला आणि विधानसभा निवडणूक लढवायचा निर्णय घेतला त्यावेळी पहिल्यांदा सुरुवातीला केज चे नाव त्याने घोषित केले परंतु काही कारणास्तव त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला त्यांच्या निर्णयाचे आम्ही स्वागत केरून त्यांचे समर्थन करून नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. अंतरवाली सराटीला अनेक वेळा गेलो व मनोज जरंगे पाटील यांच्याकडून समाजासाठी काम कसे करायचे आणि समाजासाठी कस झिजायच असत ते शिकलो व त्यांची आजही प्रेरणा घेऊन काम करणार आहे.

पृथ्वीराज साठे हे माझे पूर्वीचे जुने मित्रच आहेत आणि त्यांना पाठीमागील त्यांच्या पोटनिवडणुकीच्या निवडणुकीत देखील त्यांचे मी काम केले व त्यांना निवडून आणून गुलाल लावला आहे.

जनविकास परिवर्तन आघाडीच्या सर्व वरिष्ठ मार्गदर्शक यांचे मार्गदर्शन घेऊन सर्व कार्यकर्त्यांना विचारात घेऊनच पृथ्वीराज साठे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे व साठे साहेब यांच्या पाठीमागे मोठ्या ताकतीने उभा राहून त्यांना पन्नास हजार मतांच्या लिडने निवडून आणायचे आहे.

स्वर्गीय विमलताई मुंदडा यांचे विचार सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन जाण्याचे व समाजाच्या हिताचे होते म्हणून मी त्यांच्यासोबत गेले पंधरा वर्षे एकनिष्ठ राहून काम केले. परंतु आता मुंदडा घराण्याचा अहंकार व त्यांची घमंडी आणि दादागिरीच त्यांना नडणार आहे म्हणून त्यांचा पराजय अटळ आहे.

जनविकास परिवर्तन आघाडीला नगरपंचायत च्या निवडणुकीत केजवासीयांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे त्या प्रतिसादाला कदापि आम्ही तडा जाऊ देणार नाहीत केजचा विकास करण्यासाठी आम्ही जोडे झिजवत मुंदडा परिवाराच्या घरी गेलो पण त्यांनी चांगल्या प्रकारची वागणूक दिली नाही म्हणून त्यांना त्यांची जागा दाखवायची आहे.

केज वासियांचा स्वाभिमान व जनविकास परिवर्तन आघाडीचा स्वाभिमान आम्ही कदापि विकणार नाहीत.

यावेळी मान्यवरांनी उपस्थित कार्यकर्ते व नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन केले सर्व उपस्थित मान्यवर व कार्यकर्त्यांनी एकमताने निर्णय घेऊन पृथ्वीराज साठे यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

# डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पदयात्रांतून परिवर्तनाची नांदी

## प्रभाग १५ व १६ मध्ये मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर मतदारसंघात भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पदयात्रांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.या पदयात्रा परिवर्तनाची नांदी ठरत आहेत.गृह भेटी आणि संवाद बैठकांतून ताईंनी लातूरकरांची मने जिंकली असल्याचे दिसून येत आहे.सोमवारी सकाळी शहरातील प्रभाग क्रमांक १५ व १६ मध्ये झालेल्या पदयात्रेत हेच चित्र दिसून आले.

सोमवारी सकाळी डॉ. अर्चनाताई पाटील यांनी आदर्श कॉलनी कमानीपासून पदयात्रेस प्रारंभ केला.आदर्श कॉलनी, कम्युनिटी हॉल,नारायण नगर, मंत्री नगर,ट्युशन एरिया,सिग्नल कॅम्प,लातूर अर्बन बँक,ठाकरे चौक या परिसरातून ही पदयात्रा काढण्यात आली.

सकाळच्या उत्साही वातावरणात निघालेल्या पदयात्रेत गुरुनाथ मगे,शिरीष कुलकर्णी,अजित पाटील कव्हेकर,सुनिल मलवाड,शिवसिंह शिसोदिया,सौ. शोभाताई पाटील,सौ.वर्षा कुलकर्णी,स्वाती लोंढे,संगीत रंदाळे,अनंत गायकवाड,शिवदास मिटकरी,दिलीप धोत्रे,राजश्री बाहेती यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



गजबजलेल्या वस्तीतून ताईंची पदयात्रा जात असताना व्यापारी व व्यावसायिकांनी आपापल्या दुकानांसमोर ताईंचे पुष्पहार घालत स्वागत केले.
घरोघर महिलांनी औक्षण करत विजयाचा कौल दिला.सर्वांच्या शुभेच्छा आणि आशीर्वादाचा स्वीकार करत ताईंनी नागरिकांशी संवादही साधला. नागरिकांच्या आग्रहाखातर अनेक घरी ताईंनी भेटी दिल्या. नागरिकांनी यावेळी आपापल्या भागातील समस्या ताईंच्या कानी घातल्या.पाणी कचरा यासह मूलभूत समस्यांचा पाढा त्यांच्यासमोर वाचून दाखवला.

लातूरच्या विकासासाठी आणि नागरी समस्या सोडविण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू.नागरिकांनी खुल्या मनाने आपल्याशी संपर्क साधावा.सामान्य जनतेचा लोकप्रतिनिधी म्हणून आपण काम करत असल्याची ग्वाही डॉ. अर्चनाताईंनी ठिक-ठिकाणी नागरिकांशी बोलताना दिली.

या पदयात्रेत आबालवृद्ध सहभागी झाले होते.महिलांची संख्या यात मोठी होती.घाईची वेळ असतानाही ताईंच्या भेटीसाठी नागरिक वाट पाहत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पहावयास मिळत होते.मतदार व नागरिकांनी या पदयात्रेत उस्फूर्त प्रतिसाद दिला.ताई आपल्या परिसरात येत असल्याचे समजल्यानंतर अनेकांनी तात्काळ स्वागताची तयारी केल्याचेही जागोजागी दिसून आले.फटाक्यांची आतिषबाजी, बँड व ढोल पथक तसेच कार्यकर्त्यांच्या जोशपूर्ण घोषणा यामुळे प्रभाग क्रमांक १५ व १६ मध्ये वातावरण भाजपमय झाल्याचे दिसून आले.

**महिला घडवणार लातूर पॅटर्न ...**

पदयात्रेदरम्यान बोलताना ठिकठिकाणी महिलांनी डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर यांना समर्थन व्यक्त केले.लातूर मतदारसंघातून महायुतीने प्रथमच एका महिलेला संधी दिली आहे.कुठल्याही राजकीय पक्षाने आजपर्यंत शहरातून महिला उमेदवार दिला नव्हता. महायुतीने महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. त्यामुळे आम्ही सर्व महिला डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पाठीशी उभ्या राहणार आहोत.या माध्यमातून महिला लातूर पॅटर्न घडविणार आहेत, असे मत महिलांनी पदयात्रे दरम्यान बोलताना व्यक्त केले.

# ना. संजय बनसोडे यांच्या विजयासाठी महायुतीचे कार्यकर्ते सज्ज ;घरोघरी भेटी देऊन साधताहेत संवाद



उदगीर : सध्या विधानसभा निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून महायुतीमधील सर्वच पक्षाचे कार्यकर्ते महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या विजयासाठी सज्ज झाले आहेत. महायुतीचे कार्यकर्ते ना. बनसोडे यांच्या प्रचारार्थ घरोघरी भेटी देऊन मतदारांशी संवाद साधत ना. बनसोडे यांना विजयी करण्याचे आवाहन कार्यकर्ते करत आहेत. राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी मागच्या पाच वर्षांच्या काळात उदगीर मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलला आहे. हजारो कोटींचा विकास निधी आणून मतदार संघाच्या वैभवात मोठी भर टाकली असून जिल्हा निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या कार्यालयांची निर्मिती करून उदगीर जिल्हा निर्मितीकडे एक पाऊल टाकले आहे. उदगीर शहरातील विकासात भर घालण्यासाठी तहसील कार्यालय, पंचायत समिती, प्रशासकीय इमारत, पोलीस स्टेशन अशा विविध कार्यालयाच्या भव्य दिव्य इमारती उभारण्यासोबत, परिवहन कार्यालयाची स्थापना केली. विविध समाजघटकांना न्याय देत असताना शहरातील विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात राज्यशासनाकडून निधी खेचून आणत उदगीरचा कायापालट केला. ना. संजय बनसोडे यांनी एक दमदार मंत्री म्हणून पाच वर्षे काम केले. त्यांच्या या कामाचा आढावा मतदारांसमोर मांडत महायुतीचे घटक पक्षातील सर्व पक्षाचे पदाधिकारी शहरातील विविध प्रभागात फिरत घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधत ना. बनसोडे यांना विजयी करण्याचे आवाहन करीत आहेत. महायुतीचे कार्यकर्ते एकदिलाने ना. बनसोडे यांच्या विजयासाठी झटत असल्याने ना. बनसोडे यांचा विजय होईल असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# ग्रामीण महिलांचा आवाज विधानसभेत पोहोचवला

## हक्काचा माणूस निवडून देण्याचे सौ.प्रेरणाताई पाटील निलंगेकर यांचे आवाहन

निलंगा/प्रतिनिधी:निलंगा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या सोडवल्या. ग्रामीण महिलांचा आवाज विधानसभेपर्यंत पोहोचवला. त्यामुळे आपल्या समस्या सोडवण्यासाठी हक्काचा माणूस म्हणून माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांना या निवडणुकीत प्रचंड मताधिक्क्याने विजयी करा,असे आवाहन सौ.प्रेरणाताई संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

आशीर्वाद यात्रेदरम्यान सौ. प्रेरणाताई पाटील यांनी सोमवारी भिंगोली,हालकी,बेवनाळवाडी, अंकुलगा सय्यद, कळमगाव,रापका,गणेशवाडी, बोळेगाव बु.,लकड जवळगा, धामणगाव येथे महिलांशी संवाद साधला.यादरम्यान सौ. प्रेरणाताई पाटील बोलत होत्या.माजी जि.प.उपाध्यक्षा भारतबाई साळुंके,माजी नगराध्यक्षा वर्षाताई भिक्का, जगदेवीताई सुगावे,श्रीदेवी साबळे,रेखा भुरे,मनिषा कांबळे, नागिन शशीकर,अँड. ज्ञानेश्वर चेवले,दिलीप बानाटे,विवेक साळुंके,शरद साळुंके,रमाकांत बानाटे यांची सौ.प्रेरणाताई पाटील निलंगेकर यांच्या समवेत उपस्थिती होती.



महिलांशी संवाद साधताना सौ.प्रेरणाताई पाटील निलंगेकर म्हणाल्या की,महायुतीच्या सरकारने महिलांसाठी विविध योजना राबवल्या आहेत.लाडकी बहीण योजना अल्पावधीतच लोकप्रिय ठरली आहे.सरकारने वचननाम्यात या योजनेचा निधी दीड हजार ऐवजी २१०० रुपये करण्याचा करण्याचे आश्वासन दिले आहे.त्यामुळे पुढील हप्ता २१०० रुपयांचा मिळणार आहे.

सौ.प्रेरणाताई म्हणाल्या की, महिला सक्षमीकरण हे महायुतीचे धोरण आहे.आतापर्यंत उज्वला गॅस,गर्भवती महिलांसाठी अनुदान,एसटी प्रवासात सवलत अशा योजना सरकारने सुरू केल्या आहेत.आगामी पंचवार्षिकमध्ये आणखीही योजना महिलांसाठी राबवल्या जाणार असल्याचे सौ. प्रेरणाताई पाटील म्हणाल्या.

ताईंनी सांगितले की,आपल्या भागातील मूलभूत समस्या सोडविण्याचे काम आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले आहे.आता त्यापुढे जाऊन विकासकामे करायची आहेत.महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी आ. निलंगेकर यांनी प्रयत्न केले. आतापर्यंत आपण आ. निलंगेकर यांच्या पाठीशी उभ्या राहिला आहात.यापुढेही त्यांना साथ देऊन प्रचंड मताधिक्याने विजयी करावे,असे आवाहन सौ. प्रेरणाताई पाटील निलंगेकर यांनी केले.

ताईंच्या दौऱ्यास ग्रामीण भागात उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.ठिकठिकाणी महिलांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. लाडक्या बहिणींचे पाठबळ आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही यावेळी महिलांनी दिली.

# शासनाने एफ.आर.पी. वाढवली पण साखरेचे दर वाढवले नाहीत.माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची सरकारवर टीका

## जागृति शुगर चा १३ वा गळीत हंगामाचा शुभारंभ

देवणी / प्रतिनिधी:- केंद्र शासनाने एफ.आर.पी.चे दर वाढवले पण साखरेचे व ऊत्पादीत मालाच्या भाववाढीत खोडा घालण्याचे काम सरकारने कौशल्याने केले असल्याची खरमरीत वास्तव टिका जागृती शुगरचे संस्थापक चेअरमन तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केली. ते देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर ड अलाईड ईंडस्ट्रिजच्या १३ व्या गाळप हंगाम शुभारंभ प्रसंगी ते रवीवारी बोलत होते या प्रसंगी व्यासपीठावर जागृतीचे व्हाईस चेअरमन लक्ष्मण मोरे रेणाचे माजी चेअरमन आबासाहेब पाटील जिल्हा बॅकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर गजानन भोपनिकर, मांजरा परिवाराचे माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी, सुग्रीव लोंढे सोनू डगवाले , मालवा घोनसेबालाजी बोंबडे यांची प्रमुख ऊपस्थीती होती सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत उदासीन या वेळी बोलतांना माजी मंत्री दिलीपराव देशमूख म्हणाले की सध्याचे शासन शेतक-यांच्या हितासाठी ऊदासीन भुमीकेत असून एकीकडे एफ आर.पीचे भाव वाढवाचे मात्र दूसरीकडे साखरेचे दर मात्र वाढवायचे नाहीत सोयाबीन सह ऊत्पादीत मालाची भाववाढीत खोडा घालण्याचे कार्य सत्ताधारी शासन करीत आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले जागृति शुगर ने एफ आर पी पेक्षा ७२ कोटी रुपये जास्तीचे दिले यावेळी बोलताना दिलीपराव देशमुख म्हनाले की सामजिक बांधीलकी म्हणुन एक पाऊल पुढे टाकून आम्ही जागृतीने एफ आर.पी.पेक्षा ७२ कोटी रूपये जास्तीचे देऊन जागृतीच्या सभासद शेतक-यांना दिले व शेतक-यांसह परीसरातील देवणी ऊदगीर, निलंगा शि.अनतपाळ तालूक्यातील बाजारपेठेसह शेतमजूर कामगारांच्या जीवनात अर्थीक क्रांती केली आहे. त्यामुळे या भागांतील शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांना मोठी आर्थिक सुबत्ता देण्याचे काम जागृति शुगर च्या माध्यमातून झालेले आहे पुढेही होईल यात शंका नाही असेही ते यावेळी म्हणाले.





उस उत्पादक शेतकऱ्यांचा सत्कार या वेळी जागृतीला जास्ती जास्त ऊस पुरवठा करणा-या शेतक-यांचाही सपत्नीक सत्कार करण्यात आला या मध्ये पाटील शकूंतला दिलीप साकोळ यांनी सर्वाधिक ९०५ मे टन ऊस पुरवठा तर द्वितीय ईटकर सुभाष भिमरार घुग्गी ८६५ मे.ट. हार्वेस्टर द्वारे मोरे मधूकर श्रीपतराव चलबुर्गा यांनी १६०८०० मे.टन.ऊस देऊन १ कोटींचा व्यवसाय केले तर ट्रक च्या माध्यमातून जाधव विजय गंगाधर यांनी २९४० मेट्रीक टन बिरादार,आकाश चद्रेशेखर हाणमंतवाडी २४४१,मे ट. पवार गणेश ऊत्तमराव ४२६०मे ट.ऊस जाधव लखन शिवाजी मुबारकपूर ३२२५ मे. टन लहाण ट्रॅक्टर मध्ये चव्हाण शेषेराव हिरामन ३०८४ मे ट. ऊस पुरवठा करणा-या ऊस पुरवठा करणा-या पुरवठा दारांचा सत्कार करण्यात आला प्रास्ताविक प्रकल्प व्यवस्थापक येवले जी जी.यांनी केले मागील वर्षी जागृतीने दैनंदिन ५००० मे.ट.गाळप करून ७ लाख २ हजार मे.ट. गाळप केले दर २७६५ रूपये,भाव दिल्याचे सांगीतले दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उस उत्पादक शेतकऱ्यांनी जागृती शुगर कडे उस गाळपास द्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले यावेळी आभार प्रा. भगवान गायकवाड यांनी व्यक्त केले.

नूतन हरवेस्टर चे पूजन यावेळी जागृती शुगर ने घेतलेल्या नूतन चार हार्वेस्टर चे पूजन. माजी मंत्री सहकार महर्षी जागृती शुगर चे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख साहेब व अन्य मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले..

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE